


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ६२० . वा | गुरुवार | दि. ०७ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# माळींना पकडण्यात शहर पोलिसही ठरताहेत अपयशी...

## एका निवृत्त अधिकाऱ्याला पकडण्यात इतका उशीर का?

**पोस्टमार्टम ५३**

**जनसंचलन/ बुलढाणा**

एकीकडे राज्याचे गृहमंत्री हे राज्यात कायदा व सुव्यवस्था अत्यंत सुदृढ असल्याचा दावा करीत असतात. दुसरीकडे चित्र मात्र अगदी वेगळेच आहे. याचा प्रत्यय सध्या बुलढाणा शहरात येत आहे. एका सेवानिवृत्त अधिकाऱ्याला पकडून सामान्य रुग्णालयात हजर करण्याइतके सोपे काम देखील शहरपोलीसांकडून लवकर होताना दिसून येत नाही. यावरून शहर पोलिसांची तत्परता स्पष्टपणे अधोरेखित होत आहे. येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेल्या अनिर्बंध भ्रष्टाचारासंदर्भात सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन सातत्याने वृत्तमालिका प्रकाशित करीत आहे. या भ्रष्टाचारातून जिल्हा रुग्णालयातील प्रशासनात असलेल्या अधिकाऱ्यांमध्ये चांगलीच सुंदोपसुंदी माजली असल्याचे दिसून येत आहे. एक अधिकाऱ्याचा जिरवण्यासाठी वाटेल ते करीत आहे. भ्रष्टाचाराने अनेक अधिकारी बरबटलेले आहेत. अशातच सेवानिवृत्त रोखपाल पी. के.माळी यांच्या संदर्भात जिल्हा रुग्णालयात सध्या मोठी चर्चा आहे. माळी यांनी जिल्हा रुग्णालयात काम करताना कॅशबुकात मोठी खाडाखोड केली. प्रचंड असा भ्रष्टाचार केला. अर्थातच त्या भ्रष्टाचारात एकटे माळी हे हिस्सेदार नव्हते, त्या वाटेकरी अनेकजण होते. त्यामुळेच कधीच हा भ्रष्टाचार बाहेर आला नाही. जिल्हा रुग्णालय वरतून पाहिल्यास अगदी ठीक दिसते, परंतु प्रशासनिक पातळीवर जिल्हा रुग्णालयाचे प्रशासन अक्षरशः कुजून गेले आहे. भ्रष्टाचाराची कीड जिल्हा रुग्णालयाच्या अगदी आतपर्यंत पसरलेली आहे. अशातच अनिर्बंध भ्रष्टाचार करून पी. के. माळी हे जिल्हा रुग्णालयातून दुसरीकडे बदलीवर गेले. तेथून मग ते सेवानिवृत्त झाले. विशेष म्हणजे एव्हढा सगळा भ्रष्टाचार केल्यानंतरही माळी यांची कोणतीही चौकशी झाली नाही. त्यांना त्यांच्या सेवोत्तर काळात जे काही लाभ मिळायचे होते ते देखील विनासायास मिळत आहेत. आज प्रचंड भ्रष्टाचार करून माळी हे नामानिराळे झाले आहेत. त्यांच्या जागी आलेले लाकडे हे देखील भ्रष्टाचाराचे मूर्तिमंत उदाहरण आहे.लाकडे रोखपालपदाचा पदभार स्वीकारला. परंतु त्यांच्या भ्रष्टाचारासंदर्भात जेंव्हा दैनिक जनसंचलन व सिटी न्युजने माहिती मागण्यास सुरवात केली, तेंव्हा लाकडे रडीचा डाव खेळायला लागले. लाकडे म्हणायला लागले की, माझ्याकडे माळी यांनी परिपूर्ण चार्ज दिलाच नाही. त्यांनी मागचा बराचसा हिशेब दिलेला नाही. पर्यायाने सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या दबावामुळे अखेर जिल्हा शल्यचिकित्सकांनी वारंवार माळी यांना रुग्णालयात हजर राहून हिशेब देण्यास बजावले. मात्र, माळी आता सेवानिवृत्त झाल्यामुळे ते कोणालाही बधत नाहीत. या स्थितीत अखेर जिल्हा शल्यचिकित्सकांनी काही महिन्यांपूर्वी थेट शहर पोलिस स्टेशनला पत्र देऊन माळी यांना जिल्हा रुग्णालयात हजर करण्याची विनंती केली. आता जिल्हा रुग्णालयातील सेवानिवृत्त भ्रष्टाचारी अधिकाऱ्याला रुग्णालयात हजर करणे, हे तसे काही फार अवघड काम नाही. मात्र, ज्याप्रमाणे जिल्हा रुग्णालयाचे कामकाज अगदी ढिसाळ आहे, तसेच ढिसाळ कामकाज पोलीस प्रशासनाचे देखील दिसून येत आहे. कारण जिल्हा शल्यचिकित्सकांनी आता पत्र देऊन अनेक महिने होऊन गेल्यानंतरही शहर पोलिस पी.के.माळी यांना हजर करण्यात अपयशी ठरलेले आहेत. खरे तर जिल्हा शल्यचिकित्सकांच्या पत्रानंतर फार-फार तर आठवडाभरात माळी यांना पोलिसांनी जिल्हा रुग्णालयात हजर करणे गरजेचे होते. मात्र, एकीकडे राज्यात सक्षम पोलिस यंत्रणेचे ढोल पिटले जातात, मात्र दुसरीकडे वस्तुस्थिती अगदी वेगळीच असल्याचे दिसत आहे. माळी यांना रुग्णालयात हजर करण्याबाबत शहर पोलिस एव्हढा ढिसाळपणा का करीत आहेत, याचे उत्तर अद्यापह मिळू शकलेले नाही. यावरून एक स्पष्ट आहे की, जिल्हा रुग्णालयात जो काही भ्रष्टाचार बोकाळलेला आहे, त्याची तीव्रता, व्याप्ती किती प्रचंड आहे यावरून कल्पना येते.खरे तर माळी यांनीही जास्त या प्रकरणापासून दूर पळू नये. कारण माळी हे




जितके यापासून पळण्याचा प्रयत्न करतील, तितके ते कायद्याच्या कचाट्यात अडकत जाणार आहेत. काहीही असले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या भ्रष्टाचाराविरोधात अत्यंत कठोर आहे. जोपर्यंत जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई होत नाही, तोपर्यंत सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन शांत बसणार नाही. त्यामुळे आमचे पोलिसांनाही आवाहन आहे की, त्यांनी तात्काळ पी.के.माळी यांना जिल्हा रुग्णालयात हजर करावे व जिल्हा रुग्णालय प्रशासनाने पी.के. माळी यांना परिपूर्ण पदभार का दिला तसेच त्यांनी मागील अनेक कादपत्रे विद्यमान रोखपालांकडे का सोपवली नाहीत, याची विचारणा करावी. जोपर्यंत ही कारवाई होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलनची ही मोहीम अशीच अविरतपणे सुरू राहणार आहे.

**आमचा हा पोस्टमार्टम भाग असच सुरू राहणार**

# पतीच्या अनैतिक संबंधाला विरोध; विवाहितेला घराबाहेर हाकलून लावले...

## पतीसह तिघांविरूद्ध खामगाव शहर पोलिस स्टेशला गुन्हा दाखल...




**जनसंचलन/ खामगाव**

पतीच्या अनैतिक संबंधाला विरोध दर्शविला असता पतीसह सासू-सासऱ्यांनी विवाहितेला मारहाण केली. तसेच घराबाहेर काढून दिल्याची घटना अहमदनगर जिल्ह्यातील केळगाव येथे घडली. या प्रकरणी खामगाव माहेर असलेल्या विवाहितेने शहर पोलिसांत तक्रार दिली. या तक्रारीवरून शहर पोलिसांनी पतीसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत सौ. गायत्री सचिन कदम (२२) या विवाहितेने खामगाव शहर पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीत नमूद केले की, तिचे लग्न अहमद नगर जिल्ह्यातील केळगाव येथील सचिव बाळासाहेब कदम याच्याशी झाले. लग्नानंतर सुरूवातीचे काही दिवस सासरच्यांनी चांगले वागविले. मात्र, नंतर पतीचे बाहेर दुसऱ्या बाईशी अनैतिक संबंध उघड झाले. याला सासू सासरे यांची सहमती असून या प्रकाराला विरोध दर्शविला असता पती आणि सासू सासर्यांनी मारहाण केली. तसेच शिवीगाळ करून घराबाहेर काढून दिल्याचा आरोप तक्रारीत केला. या तक्रारीवरून पोलिसांनी पती सचीन बाळासाहेब कदम, सासू सौ. वच्छला बाळासाहेब कदम व सासरे बाळासाहेब उमाजी कदम या तिघांविरुद्ध कलम ४९८, ३२३, ५०६, ३४ भादवी नुसार गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास खामगाव शहर पोलीस करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# हिवाळी अधिवेशनात विदर्भ, मराठवाड्याच्या प्रश्नांसह विविध प्रश्नांना न्याय देणार - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे...

## कायद्याच्या चौकटीत बसणारे व टिकणारे आरक्षण देणार....

वृत्तसंस्था/ नागपूर


नागपूरमधील हिवाळी अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह शेतकरी, कष्टकरी यांच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा करून न्याय देण्याचा प्रयत्न आहे. कायद्यात बसेल व टिकेल आणि ओबीसीसह कोणत्याही घटकांवर अन्याय होणार नाही, असे मराठा आरक्षण देण्याचा या शासनाचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले. नागपूर येथे उद्या, दि. ७ डिसेंबरपासून हिवाळी अधिवेशनास सुरूवात होत आहे. यापार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री महोदयांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेस मुख्यमंत्री श्री. शिंदे बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत दादा पाटील, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे,कामगार मंत्री सुरेश खाडे, कौशल्य विकास, नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, अॅड. आशिष जायस्वाल आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, विदर्भामध्ये हे हिवाळी अधिवेशन होत आहे. विदर्भाशी आमचे जिव्हाळ्याचे एक नातं आहे. विदर्भातील जनतेला ही अधिवेशनामधून न्याय देताना एक विशेष आनंदही होत आहे. विदर्भाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस आणि कालबद्ध रितीने जे प्रकल्प, योजनांचे निर्णय घेतले आहेत, ते पूर्ण केले जातील. गेल्या दीड वर्षाच्या काळामध्ये सर्वसामान्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून समाजातल्या प्रत्येक घटकापर्यंत विकास कामे पोहोचण्याचे काम हे सरकार करत आहे. शासन आपल्या दारी या उपक्रमात काल बीडमध्ये ७० ते ८० हजार लोक उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यात सुमारे २ कोटी नागरिकांनी लाभ घेतला आहे. जिल्हाधिकारी, तलाठी, तहसीलदार हे लाभार्थ्यांपर्यंत जाऊन त्यांना लाभ देत आहेत. लाभार्थी स्टेजवर येऊन लाभ घेतात हे चित्र देशात फक्त आपल्या राज्यात दिसत आहे. आमच्या सरकारने एनडीआरएफच्या निकषापेक्षा जास्तीची नुकसान भरपाई शेतकऱ्यांना दिली आहे. अवकाळी पावसाच्या पार्श्वभूमीवर नुकसान होत असलेल्या ठिकाणी तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना देण्यात आले आहेत. केंद्र शासनाने शेतकऱ्यांना सहा हजार रुपये प्रधानमंत्री किसान योजनेत लाभ दिला आहे. त्याबरोबरच देशात महाराष्ट्र शासनाने नमो शेतकरी महासन्मान योजना घोषित करून आणखी सहा हजार प्रति शेतकरी लाभ देण्यात सुरूवात केली



आहे. अवकाळी गारपीटीग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यात शासन हात आखडता घेणार नाही, असेही श्री. शिंदे यांनी यावेळी सांगितले. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, मराठा आरक्षणविषयावर सरकारची भूमिका ही सुरुवातीपासून अतिशय प्रामाणिक आहे. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसींवर कुठलाही अन्याय होणार नाही तसेच इतर समाजावर अन्याय होणार नाही. तसेच कोणाचेही आरक्षण कमी केले जाणार नाही, ही आमची स्पष्ट भूमिका आहे. त्यावर मंत्रिमंडळ हे ठाम आहे. मराठा समाजाला टिकणारे, कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे. त्यामुळे दोन्ही समाजाने संयम ठेवावा.

## माहेरी आलेल्या विवाहितेने केली आत्महत्या...

जनसंचलन/ खामगांव



बहिणीच्या लग्नाकरिता माहेरी आलेल्या विवाहितेने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना स्थानिक शंकर नगर भागात उघडकीस आली आहे. नाजमिन परवीन सैय्यद तरबेज वय ३० वर्षे रा. अकोला ही विवाहिता बहिणीच्या लग्नाकरिता स्थानिक शंकर नगर भागात वडिलांकडे आली होती. दरम्यान काल ४ डिसेंबर रोजी तिने वडिलांच्या घरी वरच्या खोलीत छताच्या पंख्याला गळफास लावून आत्महत्या केली. काही वेळाने ही घटना उघडकीस आली. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणी पोलिसांनी १७४ जाफौनुसार मर्ग दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. सदर विवाहितने आत्महत्या का केली याचे नेमके कारण समजू शकले नाही.

## विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरात विविध ठिकाणी रक्तदान रुपी अभिवादन पर कार्यक्रम संपन्न..





जनसंचलन/बुलढाणा

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील महामानव ग्रुपच्या वतीने तसेच सार्वजनिक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले जयंती उत्सव समिती च्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महामानव ग्रुपच्या वतीने मागील १२ वर्षापासून सलग ६ डिसेंबर रोजी जिल्हा सामान्य रुणालय येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केल्या जाते हजारो युवकांनी आतापर्यंत रक्तदान देऊन महामानव बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकरांना रक्तदान रुपी अभिवादन केले महामानव ग्रुपच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात दुपारी १२ वाजेपर्यंत २०० रक्तदात्यांनी नोंद केली होती. हा आकडा सायंकाळपर्यंत वाढलेला आहे. गेल्यावर्षी २५० युवकांनी रक्तदान केले होते. जिल्ह्यात कुठेही रक्ताचा तुटवडा कमी जाणवू नये गरज वतांना लवकरात लवकर रक्त मिळाले पाहिजे हा उदेश महामानव ग्रुपच्या वतीने करण्यात आला आहे. जिल्हा सामान्य रुणालय येथे महामानव ग्रुपच्या वतीने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस माल्या अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने देखील स्थानिक जयस्तंभ चौक गांधी भवन येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी सुध्दा जास्तीत जास्त युवकांनी आपले रक्तदान केले आहे.

## वृद्धाची गळफास घेऊन आत्महत्या

जनसंचलन/मलकापूर



आजाराला कंटाळून गावातील ७५ वर्षीय नारायण जगदेव भोलणकर या वृद्धाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना ५ डिसेंबर राजी दुपारी दोन वाजता घडली. बऱ्याच दिवसांपासून आजारी असलेले नारायण जगदेव भोलणकर यांनी स्वतः च्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांना दोन्ही डोळ्यांनी दिसत नव्हते, तसेच बऱ्याच दिवसांपासून ते आजारी होते. घरातील छताच्या लाकडी दांड्याला गळफास घेऊन ते खाटेवरच बसले असताना मृत्यू झाला. दुपारी दोन वाजेदरम्यान त्यांचा नातू विशाल भोलनकर यांनी दसरखेड एमआयडीसी पोलिस स्टेशनला माहिती दिली. पोलिसांनी पंचनामा केला, उपजिल्हा रुणालय मलकापूर येथे शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# सामाजिक बदलाचे पाऊल, परिषदेचे जय्यत नियोजन

# विधवा महिला परिषदेत सहभागी व्हा- प्रा.डी एस लहाने

जनसंचलन/बुलढाणा

विधवा महिलांना सन्मानजनक वागणूक मिळावी, विधवा विवाहाला प्रोत्साहन मिळावे व त्यांना आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर होता यावे यासाठी बुलढाण्यात विधवा महिला परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.महात्मा फुले यांच्या नंतर १०० वर्षानी होणारी विधवा परिषद ऐतिहासिक आहे. यामधे विधावा, घटस्फोटित महीला त्यांचे आई,वडील, सासू सासरे , सामाजिक कार्यकरत्यांनी सहभागी होण्याचे आवाहन प्रा. डी एस लहाने यांनी पत्रकार परिषदेत केले. बुलढाणा येथील तुलसी नगर येथे विधवा महिला परिषदेचे आयोजन दिनांक १० डिसें. रोजी करण्यात आले आहे.याचे जय्यत नियोजन शिवशाही परिवार व मानस फाउंडेशन द्वारा करण्यात आले आहे. यासंदर्भात स्थानिक विश्रामगृह येथे पत्रकार परिषदेत माहिती देण्यात आली. यावेळी परिषदेचे आयोजक प्रा. डी एस लहाने ,पत्रकार गणेश निकम केळवदकर ,प्रा. शाहिनाताई पठाण, प्रतिभा भुतेकर, प्राचार्य ज्योती पाटील ,अश्विनी सोनवणे आदींनी भूमिका मांडली. पुढे बोलताना प्राध्यापक डीएस लहाने म्हणाले- महाराष्ट्राच्या इतिहासात प्रथमच महिला विधवा परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.



विधवा महिलांच्या जीवनात अनंत अडचणी उभ्या असतात. सहजीवनाचा साथी सोडून गेल्यानंतर समाज ही त्या महिलेस वा-यावर सोडतो. तिच्यावर अनेक बंधने लादली जातात. तीच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोणही बदलतो. शुभकार्यात मुद्दाम अशा स्त्रीला मागे ठेवल्या जाते. महिला तशाही आर्थीकदृष्ट्या आत्मनिर्भर नसतात. त्यासाठी त्यांना कुटूंबावर अवलंबून रहावे लागते. ऐकीकडे आर्थीक विंवचना तर दुसरकीडे सामाजिक कुचंबना असतांना विधवा पुनरविवाहाचा विचार कोणाच्या मनी मानसीही येत नाही. या सर्व समस्यांचा विचार करून शिवसाई परिवार व मानस फाऊंडेशन द्वारा विधवा परितक्त्या महिला परिषदेचे आयोजन बुलडाणा नगरीत करण्यात येत असल्याचे प्रा.लहाने म्हणाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे तर उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थित राहणार आहे. सामाजिक बदल सहजासहजी होत नाही.त्यासाठी डोळस लोकांनी पुढे आले पाहिजे.विशेषतः ज्याची मुलगी विधवा आहे अश्या पालकांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या शाहिना पठाण यांनी केले.पत्रकार गणेश निकम यांनी आयोजन बद्दल माहिती दिली तर प्राचार्य जोती पाटील,अस्विनी सोनने यांनी परिषदेची भूमिका मांडली. विधवा महिलांना आर्थीक आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्न , शासनस्तरावर विधवांच्या प्रश्नांना वाचा फोडणे, विधवांचा सामाजिक, मानसिक, आर्थीकस्तर उंचावण्याचा प्रयत्न करणे विधवा पुनरविवाहास प्रोत्साहान मिळावे, हे उद्देश आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त ज्ञानेश्वर विद्यालय तर्फे अभिवादन

जनसंचलन/ चिखली

श्री ज्ञानेश्वर विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय पेठ येथे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला प्रथम बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन ज्ञानेश्वर विद्यालय कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य आर डी गायकवाड सर तसेच पर्यवेक्षक वाघ सर व इतर शिक्षक मंडळींनी केले कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी बाबासाहेबांच्या जीवनावर प्रकाश टाकला तसेच बाबासाहेबांच्या जीवनावर श्री हिवरकर सर मार्गदर्शन केले तसेच यांनी बाबासाहेबांचे विचार व भारतीय राज्यघटने विषयीची माहिती पर्यवेक्षक श्री वाघ सर यांनी दिली. आणि अशा



प्रकारे कार्यक्रम साजरा करण्यात आला त्या कार्यक्रमांमध्ये एस वाय जाधव सर . सागर शेळके करडेल सर भाकडे सर झाल्टे सर बंगाळे सर डीबी शेळके सर जी टी शेळके सर एन एच जाधव सर काकडे मॅडम व पत्रकार मेघा जाधव व सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते अशाप्रकारे डॉ बाबासहेब आंबेडकर यांना अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला

# शेतात गुरं सोडून पिकांचे नुकसान दोघांविरुध्द गुन्हा...

जनसंचलन/खामगाव

खामगाव दोन इसमानी शेतातील उभ्या पिकात गुरं सोडून पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केल्याची घटना वरखेड खु. शिवारात घडली. या प्रकरणी तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत अनिल शांताराम बुंदेले वय ५३ वर्षे यांनी शहर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दिली की, त्यांच्या बरखेड खुर्द शिवारातील शेतात भास्कर इंगळे व सलमान हुसैन यांनी गुर सोडून पिकाची नासधूस केली. यामुळे बुंदेले यांचे १



लाख २० हजाराचे नुकसान झाले. याबाबत जाब विचारला असता त्या दोघांनी बुंदेले यांना शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. या तक्रारीवरून पोलिसांनी भास्कर इंगळे व सलमान हुसैन यांच्या विरुद्ध कलम ४२७, ५०४, ५०६, ३४ भादवी नुसार गुन्हा दाखल केला आहे.

# राज्यातील पतसंस्थांना बुस्टर डोज ठेवीदारांना सुरक्षिततेची खात्री व अडचणीतील पतसंस्थांना पाठबळ...

जनसंचलन/बुलढाणा

राज्यातील बहुराज्यीय सहकारी पतसंस्थांच्या स्थैर्यासाठी ॲसेट रिकन्स्ट्रक्शन को-ऑपरेटिव्ह सोसायटीच स्थापन करण्यात आली आहे. यासाठी मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशनने पुढाकार घेतला असून १०० कोटींचे भागभांडवल उभारण्यात आले आहे. यामुळे ठेवीदारांना सुरक्षिततेची खात्री व अडचणीतील पतसंस्थांना पाठबळ मिळणार आहे. देशातील आघाडीची पतसंस्था असलेल्या बुलडाणा अर्बनचे सर्वेसर्वा राधेश्याम चांडक यांनी ही माहिती दिली. यासंदर्भात नुकतीच मल्टीस्टेट पतसंस्था फेडरेशनची निर्णायक ऑनलाईन बैठक घेण्यात आली. त्यात हा निर्णय घेऊन ह्ड्एआरसीफ्ची आचारसंहिताही निश्चित करण्यात आली आहे. बैठकीस फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश उपाख्य काका कोयटे, फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटीचे संचालक जितेंद्र जैन, आदी उपस्थित होते. बैठकीअंती एआरसी अर्थात ॲसेट रिकन्स्ट्रक्शन को-ऑप. सोसायटीची सहकारी तत्वावर स्थापना करण्यात आली आहे. देशातील राष्ट्रीयीकृत सहकारी व खासगी बँकांकरिता ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कोआप. सोसायटी कंपनीची संकल्पना आहे. त्याच पद्धतीने ही संस्था कार्यरत राहणार आहे. त्यासाठी १०० कोटी रुपयांचे भाग भांडवल जमा करण्यात आले असल्याची माहितीही चांडक यांनी दिली. एआरसीची येत्या सहा महिन्यात केंद्रीय निबंधकांकडून नोंदणी करण्यात येणार आहे. ठेवीदारांच्या व्याज दराचा मुद्दा तथा बीडमधील वादात आलेल्या पतसंस्थांच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिताही निश्चित करण्यात आली आहे. पतसंस्था ठेवींना १० टक्क्यांपेक्षा जादा व्याजदर देणार



नाही, किमान २५ टक्के तरलता राखत एक टक्का रोख तरलता ठेवण्याचा निर्णयही बैठकीत घेण्यात आला. धनंजय तांबेकर यांच्या अध्यक्षतेखालील समिती संस्थेचे उपविधी तयार करून केंद्रीय निबंधकांची भेट घेणार आहे. एआरसी अर्थात, ॲसेट रिकन्स्ट्रक्शन को-ऑप. सोसायटीची स्थापना झाली आहे. त्याची केंद्रीय निबंधकांकडून सहा महिन्यांत नोंदणी पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यामुळे पतसंस्थांना स्थैर्य मिळून जनमानसात आर्थिक विश्वासार्हता निर्माण होईल.- राधेश्याम चांडक, संस्थापक अध्यक्ष, बुलढाणा अर्बन.

# जिल्हा परिषद कर्मचाऱ्याचे निलंबन मागे घ्या या मागणीसाठी वंचित चे सिओ च्या कॅबिन मध्ये ठिय्या आंदोलन....

# १० दिवसाचा अल्टीमेटम अन्यथा उग्र आंदोलनाचा ईशारा...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्हा परिषद च्या शिक्षण विभागातील दोन शिक्षकांना कुठलेही कारण नसताना निलंबीत करण्यात आले होते... त्या कर्मचाऱ्याना पुन्हा रुजू करून घेण्यात यावे यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हा परिषद च्या सिओ यांच्या कक्षात ठिय्या आंदोलन करण्यात आले... तसेच सिओ गैरहजर असल्याने त्याच्या खुर्चीला हार घालून निषेध व्यक्त करण्यात आला... यावेळी उपमुख्याधिकारी आशिष पवार यांच्याशी चर्चाच झाली त्यांनी २ दिवसाचा अवधी मागितला



त्यानुसार वंचितच्या वतीने १० दिवसाचा अवधी ड्रेण्यात आला असून जर १० दिवसाट्य्या दोन शिक्षकांना रुजू करून घेतल्या गेले नाही तर जिल्हा परिषद इमारतीला घेरावं घालून टीवर आंदोलन करण्यात येईल असा ईशारा वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांनी दिला आहे

# सरकारमधील ३ मंत्री पैशांशिवाय काम करत नाही

# विजय वडेट्टीवारांचा घणाघाती आरोप...

वृत्तसंस्था/मुंबई

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी माणूस म्हणून जगण्याचा अधिकार हा सर्व भारतीयांना दिला आहे. जगातील सर्वोत्कृष्ट संविधान बाबासाहेबांनीचं देशाला दिलं आहे. त्यामुळेच देशातील लोकशाही चंद्र आणि सूर्य असेपर्यंत टिकणार असल्याच्या भावना विधानसभेचे विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केल्या आहेत. संविधान रुपी ग्रंथाची जोपासना करू,टिकवू आणि रक्षण करू हीच खरी श्रद्धांजली बुधवारी महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने महामानवाला ठरेल अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे, ते नागपूरच्या दीक्षाभूमी येथे बोलत होते. विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी यावेळी राज्य सरकारवर सडकून टिका केली. हिवाळी अधिवेशनात आरोग्य विभागातील घोटाळे बाहेर काढणार असल्याचेही वडेट्टीवार यांनी इशारा दिला. सरकारमधील ३ मंत्री पैशांशिवाय काम करत नाही, असेही वडेट्टीवार म्हणाले. मात्र, वडेट्टीवार यांनी मंत्र्यांची नावे जाहीर केली नाही. आरोग्य विभागात खूप मोठे घोटाळे सुरू आहे. हिवाळी अधिवेशनात आरोग्य खात्यात भोंगळ कारभार समोर आणणार असल्याची प्रतिक्रिया विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली आहे. आरोग्या मंत्री तानाजी सावंत यांचे अनेक घोटाळे आहे. आरोग्य विभागामध्ये अनेक टेंडर घोटाळे झाले आहेत. ते सर्व घोटाळे विधानसभेमध्ये मांडू, असे वडेट्टीवार यांनी सांगितले. भ्रष्ट्राचाराचे पुरावे दिल्यानंतर तरी मुख्यमंत्री कारवाई करतील का, या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आम्ही कारवाई करा म्हणून सभागृहात मागणी करू, असे विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. चोरांना समर्थन देऊन स्वतः आरोपीच्या पिंजऱ्यात उभा राहू नका, असा इशारा विजय वडेट्टीवर यांनी इशारा दिले. तिघे मिळून तिजोरीची लूट करत आहे पैशांशिवाय मंत्री कामंच करत नाहीय. २० टक्के पेक्षा जास्त कमिशन घेणारे हे राज्य महारष्ट्र झाले असल्याचा घणाघाती आरोप विजय वडेट्टीवार यांनी यावेळी केला. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर



यांना नागपूर येथील पवित्र दीक्षाभूमी येथे अभिवादन केले. यावेळी त्यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, केंद्र सरकार दररोज संविधानाचे चार ही स्तंभ पायदळी तुडवत आहे. संविधान सुरक्षित ठेवण्यासाठी केंद्र सरकारला खाली खेचण्याचा संकल्प आज करावा लागेल, असेही नाना पटोले यांनी सांगितले.

# राज्यातील शाळांच्या वेळा बदलणार? राज्यपाल यांच्या वक्तव्यानंतर चर्चांना उधाण




वृत्तसंस्था/मुंबई

राज्यातील शाळांच्या वेळा बदलणारी की काय अशी चर्चा सध्या रंगू लागली आहे. राज्याचे राज्यपाल रमेश बैस यांनी शाळेच्या वेळांबाबत केलेल्या वक्तव्यामुळे याबाबत चर्चा सुरु झाल्या आहे. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या अभियानाचा शुभारंभ राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दि ५ डिसेंबर रोजी करण्यात आला, त्यावेळी राज्यपाल बोलत होते. राज्यपाल बैस यांनी शाळांच्या वेळाबाबत म्हटलं की, बदलत्या जीवनशैलीमुळे झोपेच्या वेळांमध्येही बदल झाले आहेत. मुलं रात्री उशीरापर्यंत जागीच असतात. त्यानंतर सकाळी लवकर उठून त्यांना शाळेत जावं लागतं. त्यामुळे मुलांची झोप देखील पूर्ण होत नाही. मुलांना चांगली झोप मिळावी, या शाळांच्या वेळांमध्ये बदल होण्याच्या दृष्टीने विचार होणं गरजेचं आहे. राज्यपाल रमेश बैस पुढे म्हणाले की, शिक्षण हे मनुष्य निर्माण करणारे असावे, असं स्वामी विवेकानंद यांना अपेक्षित होते. गरीब मुलगा शिक्षणात येऊ शकत नसेल तर त्याच्याकडे शिक्षण गेले पाहिजे. आजची मुले पुस्तक वाचत नसतील, पण स्मार्ट फोन, इंटरनेट, सोशल मीडिया अशा विविध माध्यमातून ज्ञान व माहिती घेत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी पुस्तकांऐवजी ऑडिओ बुक्स, व्हिडिओ बुक्स आणि ई-बुक्सची निर्मिती करावी, असा सल्ला राज्यापालांनी दिला आहे. शाळांध्ये ई-वर्गांना चालना देण्याची गरज आहे. यातून मुलांच्या दप्तराचा भार हलका करण्यासाठी पुस्तकाविना शाळेचा विचार करता येईल. गुणवत्तेनुसार शाळांना श्रेणी द्याव्यात आणि यापैकी सर्वोत्तम शाळांना बक्षिसे द्यावीत. या माध्यमातून शाळांमध्ये सुधारणेसाठी स्पर्धा निर्माण होईल, असं बैस यांनी सूचवलं.

बुलडाणा शहर व परिसरातील रुग्णांच्या सेवेसाठी अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज असे
डॉ. ऋषिकेश अशोक निकम यांचे ....
निकम ॲक्सीडेंट व ट्रॉमा सेंटर
पत्ता: डॉ. व्यवहारे हॉस्पिटल(पहिला मजला), जांभरुण रोड, बुलडाणा
मो. 9923191666
* उपलब्ध सुविधा *
- कृत्रिम सांधे प्रत्यारोपण
- अति जोखीमीचे हाडांची शस्त्रक्रिया
- लहान बाळांचे जन्मजात वाकडे पायावर उपचार (क्लबफूट)
- संधीवातावर उपचार
- गुडघ्याची दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया
- फ्रॅक्चरवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे उपचार व शस्त्रक्रिया
- मणक्यातील आजारावर उपचार
- दुर्बिणीद्वारे सांध्याची तपासणी व शस्त्रक्रिया
- कंबरेचे व मानेचे दुखणे
- पायातुन व हातातून तीव्र वेदना, मुंग्या येणे, अधू होणे यावर उपचार
डॉ. ऋषिकेश अशोक निकम
M.B.B.S, D-ORTHO (Mumbai)

# इंजेक्शन दिल्यानंतर रुग्णांचा मृत्यू नातेवाईकांचा आक्रोश, काही काळ तणाव पोलिसांनी सांभाळला मोर्चा



जनसंचलन/बुलढाणा

शहरातील जोहर नगर भागात राहणाऱ्या शेख आसिफ या तरुणाची शहरातील सोळंके -ले आऊट मधील माळी रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यासाठी ३ डिसेंबर २०२३ रोजी दाखल करण्यात आले होते. डॉक्टरने ऑपरेशनची तयारी करून बेशुद्ध करण्यासाठी अनेसथेसियाचा इंजेक्शन दिल्यानंतर शेख आसिफ बराच वेळ झाल्यानंतरही शुद्धीत आला नाही. दरम्यान त्याची प्रकृती खालावली म्हणून पुढील उपचारासाठी लद्धड हॉस्पिटल येथे ४ डिसेंबर रोजी दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना शेख आसिफ याचा दुपारच्या दरम्यान मृत्यू झाला. ही माहिती आसिफचे नातेवाईक व मित्रांना मिळताच त्यांनी माळी रुग्णालयाकडे धाव घेतली व काहींनी गोंधळ घातला. याची माहिती पोलिसांना मिळताच पोलिसांचा ताफा रुग्णालया परिसरात दाखल झाला. तसेच काही वेळानंतर आमदार संजय गायकवाड रुग्णालयात पोहोचले व त्यांनी संबंधित डॉक्टर व मृतकाच्या नातेवाईकांची समजूत काढल्यानंतर तणाव निवळला. शेख आसिफ हा घरातील कर्ता पुरुष होता. या घटनेमुळे त्याचा परिवार उघड्यावर आला असून त्यांच्यावर आता उपासमारीची वेळ आली आहे. शेख आसिफ हा घर परिवार चालविण्यासाठी छोटा-मोठा व्यवसाय हात गाडीवर करून त्याचा संसार चलवीत होता. या घटनेमुळे त्याच्या परिवारावर डोंगर कोसळला आहे. त्याचा मृत्यू नेमका कशामुळे हे अद्याप स्पष्ट झाले नाही, तरी याची चौकशी करून त्या गरीब कुटुंबाला न्याय मिळावा, अशी मागणी सामान्य नागरिकात होताना दिसत आहे.

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी

8x8 cm
1 Month=5000/-
15 Day=3500/-
7 Day=2000/-
Hight 8 cm
Width 8 cm

5x8 cm
1 Month=3500/-
15 Day=2200/-
7 Day=1500/-
Hight 5 cm
Width 8 cm

5x8 cm
1 Month=3500/-
15 Day=2200/-
7 Day=1500/-
Hight 5 cm
Width 23 cm

एक दिवसाची जाहिरातः वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.

One Day
Full Page= 8000/-
1/2 Page= 5000/-

2600/-
Hight 12 cm
Width 12 cm

1800/-
Hight 8 cm
Width 10 cm

1300/-
Hight 8 cm
Width 8 cm

T & C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी
केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस
फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:

अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com